# जाहीर नोटीस
# प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रत्नागिरी यांचे न्यायालयात

या जाहीर नोटीशीद्वारे असे कळविण्यात येते की, ....

जिल्हा न्यायालय, रत्नागिरी येथील संगणक विभाग येथे ४२ ए.एच. १२ व्होल्ट च्या १२ बॅट—या खरेदी करणेचे आहेत.

तरी ज्या कोणा व्यक्ती अगर संस्था यांना वर नमुद प्रमाणे ४२ ए.एच. १२ व्होल्ट च्या १२ बॅट—या उधारीने योग्य दरात पुरविणे शक्य असेल त्यांनी दरपत्रके खालील अटी व शर्तीस अधीन राहून ही नोटीस जिल्हा न्यायालयाचे नोटीस बोर्डवर प्रसिध्द केलेपासून आठ दिवसांचे आत म्हणजेच दिनांक ०५/०२/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत सहाय्यक अधिक्षक (वित्त), जिल्हा न्यायालय, रत्नागिरी येथे समक्ष आणून द्यावीत.

## दरपत्रकांबाबत अटी व शर्ती

१. दरपत्रक आवश्यक त्या संपूर्ण तपशीलासह तारखेसहीत मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रत्नागिरी यांचे नावे असावे.

2- दरपत्रक बंद लखोटयातून असावे व लखोटा मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रत्नागिरी यांचे नावे नमूद असावा. लखोटयावर '४२ ए.एच. १२ व्होल्ट च्या १२ बॅट—यांबाबतचे दरपत्रक' असे नमूद असावे.

३. जाहीर नोटीस मधील दिलेल्या तारखेनंतर अथवा कार्यालयीन वेळेनंतर आलेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही/ग्राहय धरले जाणार नाही.

४. सर्वांत कमीत कमी दराचे दरपत्रक व वस्तूचा दर्जा चांगला असेल असे दरपत्रक असेल त्या दरपत्रकाचा विचार करणेत येईल. दरपत्रकामध्ये खाडाखोड करणेत येवू नये.

5- पुरविणेत आलेल्या ४२ ए.एच. १२ व्होल्ट च्या १२ बॅट—या हया चांगल्या स्थितीत असणे आवश्यक आहे. सदरील बॅट—या खराब निघाल्यास त्या नव्याने पुरविणे बंधनकारक राहील.

६. दरपत्रक देणाऱ्या व्यक्तिकडे दुकानाचे लायसन असणे आवश्यक आहे.

7- वरीलप्रमाणे दरपत्रक दाखल करणारी व्यक्ती/संस्था यांनी ४२ ए.एच. १२ व्होल्ट च्या १२ बॅट—यां चे दरपत्रकात जी.एस.टी. दर नमुद करणे आवश्यक आहे.

८. अपवादात्मक परिस्थितीत दरपत्रक नाकारण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रत्नागिरी यांना राहिल.

आज दि. २९/०१/२०२५ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

दिनांक— २९/०१/२०२५

प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, रत्नागिरी.

म.जा.क्र. वित्त/ ६४५ /२०२५
जिल्हा न्यायालय, रत्नागिरी
दि. २९/०१/२०२५

<u>प्रत नोटीस बोर्डवर व वेबसाईटवर प्रसिध्दी करिता:—</u>

१. सहाय्यक अधीक्षक (वित्त), जिल्हा न्यायालय, रत्नागिरी यांजकडे
२. जिल्हा संगणक प्रणाली प्रशासक, जिल्हा न्यायालय, रत्नागिरी यांजकडे